टाटा पॉवर-टी साठी आर्थिक वर्ष २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी सत्य पडताळा, आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी कामगिरीची पडताळणी आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी अंदाज

## २. कार्यकारी सारांश

### २.१ आताच्या सादरीकरणाबाबतचा सर्वांगीण दृष्टीकोण

**ऐतिहासिक दृष्टीकोण**

टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (टाटा पॉवर) या कंपनीची स्थापना १९१९ साली झाली. १ एप्रिल २००० रोजी टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१० साली स्थापन) आणि आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१६ साली स्थापना) या टाटा पॉवरमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आणि त्यातून एकात्मिक कंपनी स्थापन केली गेली. या एकत्रीकरणाच्या नंतर वर नोंदवलेल्या कंपन्यांच्या परवान्याचेही विलिनीकरण करण्यात आले आणि टाटा पॉवरला महाराष्ट्र सरकारकडून (जीओएम) आपल्या मुंबई परवाना विभागातील जनतेला ऊर्जा पुरवठ्यासाठी आणि वितरण परवानाधारकांना अधिसूचना क्रमांक आयईए- २००१/सीआर-१०५०९/एनआरजी-१ दिनांक १२ जुलै २००१ नुसार मोठ्या प्रमाणावर ऊर्जा पुरवठा करण्यासाठी परवानगी देण्यात आली.

टाटा पॉवरला दिलेला हा परवाना १५ ऑगस्ट २०१४ पर्यंत वैध होता. त्यानंतर टाटा पॉवर-टी ने मुंबई आणि मुंबईबाहेर असणाऱ्या टाटा पॉवर कंपनीच्या मालकीच्या किंवा भविष्यात टाटा पॉवर कडून बांधले जाणाऱ्या आणि खटला क्र. ११२/२०१४ नुसार राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा भाग बनणाऱ्या पारेषण वाहीन्या आणि रिसीव्हिंग स्टेशनसाठी, पारेषण परवानाच्या मान्यतेसाठी अर्ज सादर केला. माननीय आयोगाने विद्युत अधिनियम -२००३ नुसार आणि संबंधित नियमांच्या पूर्ण पडताळणीनंतर टाटा पॉवर कंपनीला पारेषण परवान्यासाठी १६ ऑगस्ट २०१४ पासून २५ वर्षांसाठी मान्यता दिली.

### २.२ सध्याच्या याचिकेअंतर्गत सादरीकरणे

टाटा पॉवरने या याचिकेत दुसऱ्या नियंत्रण कालावधीच्या विविध वर्षांसाठी आवश्यक असलेल्या एकूण महसुलाचे सादरीकरण केले आहे.

- प्रत्यक्ष कामगिरीवर आधारित आर्थिक वर्ष २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी सत्य पडताळा.
- आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या पहिल्या सहा महीन्यांच्या प्रत्यक्ष कामगारीवर आधारीत आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या कामाची पडताळणी आणि दुसऱ्या सहा महीन्यांसाठी अंदाजपत्रक.
- आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी सुधारित अंदाजपत्रक
- माननीय एटीईच्या अपील १०४/२०१२, अपील क्रमांक १५८/२०१२ (ज्यासाठी आर्थिक वर्ष २०११-१२चे सुधारित एआरआर सादर करण्यात आलेले आहेत) आणि अपील क्रमांक १३३/२०१३ साठीच्या निर्णयांचा परिणाम
- भांडवलीकरणाचा पुनर्अभ्यास, कर्ज, कर्जांसाठी पुनर्वित्तपुरवठा आणि माननीय एटीई आणि माननीय आयोगाच्या विविध निर्णयांवर आधारित आरओई.

२.२.१ नियंत्रण कालावधीदरम्यान भांडवलीकरण

टाटा पॉवर-टीने खालील तक्त्यात आर्थिक वर्ष २०११-२०१२, २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी प्रत्यक्ष भांडवली खर्च आणि भांडवलीकरण सादर केले आहे आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ दरम्यान अंदाजित भांडवली खर्च आणि भांडवलीकरण सादर केले आहे.

तक्ता २.१: भांडवली खर्च आणि भांडवलीकरण.

रू. कोटी

| प्रवर्ग | भांडवली खर्च | | | | | भांडवलीकरण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एफवाय **2011-12** (प्रत्यक्ष) | एफवाय **2012-13** (प्रत्यक्ष) | एफवाय **2013-14** (प्रत्यक्ष) | एफवाय **2014-15** | एफवाय **2015-16** | एफवाय **2011-12** (प्रत्यक्ष) | एफवाय **2012-13** (प्रत्यक्ष) | एफवाय **2013-14** (प्रत्यक्ष) | एफवाय **2014-15** | एफवाय **2015-16** |
| डीपीआर | 344.72 | 302.68 | 224.32 | 311.74 | 462.75 | 228.32 | 323.87 | 271.43 | 325.50 | 303.97 |
| नॉन डीपीआर | 26.18 | 31.19 | 32.63 | 41.40 | 60.39 | 20.46 | 17.78 | 30.25 | 46.06 | 62.64 |
| एचओ/एसएएस | 3.81 | 4.56 | 0.00 | 0.00 | 0.00 | 3.81 | 4.56 | 9.40 | 0.00 | 0.00 |
| एकूण | **374.72** | **338.43** | **256.95** | **353.15** | **523.13** | **252.59** | **346.21** | **311.08** | **371.56** | **366.62** |

**२.२.२ समभागांवर परतावा (आरओई):**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहू-वर्षीय वीज दर) विनियम २०११ वर आधारित टाटा पॉवर-टीने आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी प्रत्यक्ष भांडवलीकरणावर आधारित रिटर्न ऑन इक्विटीसाठी व आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी प्रस्तावित भांडवलीकरणावर मूल्यमापन केले आहे. याच बाबीवर आधारित आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ वरील आरओई खालीलप्रमाणे कार्यान्वित करण्यात आला आहे.

**तक्ता २.२ समभागांवर परतावा**

रू. कोटी

| अनु क्र | तपशील | एफवाय **2011-12** (प्रत्यक्ष) | एफवाय **2012-13** (प्रत्यक्ष) | एफवाय **2013-14** (प्रत्यक्ष) | एफवाय **2014-15** | एफवाय **2015-16** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वर्षाच्या सुरूवातीला नियामकांचे समभाग | **532.40** | **607.75** | **710.75** | **802.94** | **914.41** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | वजा: वर्षाच्या कालावधीत भांडवलीकरण न झालेले/निवृत्त झालेले समभाग | (0.43) | (0.86) | (1.14) | - | - |
| 3 | भांडवलीकरण | 252.59 | 346.21 | 311.08 | 371.56 | 366.62 |
| 4 | भांडवलीकरणाचा समभाग भाग | 75.78 | 103.86 | 93.32 | 111.47 | 109.98 |
| 5 | वर्षाच्या शेवटी नियामक समभाग | **607.75** | **710.75** | **802.94** | **914.41** | **1,024.39** |
| | परतावा मोजणी | | - | - | - | - |
| 6 | वर्षाच्या सुरूवातीला नियामक समभागांवर परतावा | 82.52 | 94.20 | 110.17 | 124.46 | 141.73 |
| 7 | भांडवलीकरणाच्या समभाग भागावर परतावा | 5.84 | 7.98 | 7.14 | 8.64 | 8.52 |
| **8** | नियामक समभागांवर एकूण परतावा | **88.36** | **102.18** | **117.31** | **133.09** | **150.26** |

### २.२.३ व्याज आणि वित्तीय शुल्क

खालील तीन बाबींवर व्याजासाठीचे शुल्क आकारण्यात आले आहे.

- कर्जावरील व्याज
- चालू भांडवलावरील व्याज
- इतर वित्तीय शुल्क

- **कर्जावरील व्याज**

आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी भांडवलीकरणासाठी निधी पुरवण्यासाठी घेतलेल्या कर्जांचा तपशील कलम ५.४.१, ६.४.१ आणि ७.५ मध्ये देण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०११-१२, आर्थिक वर्ष २०१२-१३, आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी कर्ज भांडवलावरील प्रत्यक्ष व्याज आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी प्रस्तावित खालीलप्रमाणे आहे-

**तक्ता २-३ : कर्ज भांडवलावरील व्याज**

रू. कोटी

| तपशील | एफवाय 2011-12 (Actuals) | एफवाय 2012-13 (Actuals) | एफवाय 2013-14 (Actuals) | एफवाय 2014-15 | एफवाय 2015-16 |
|---|---|---|---|---|---|
| सुरूवातीची शिल्लक | 327.66 | 475.34 | 649.97 | 782.88 | 944.13 |
| बेरीज | 194.97 | 242.34 | 217.76 | 260.09 | 256.63 |
| पुर्नदेयता | (47.28) | 67.71 | 84.85 | 98.83 | 117.41 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शेवटची शिल्लक | 475.34 | 649.97 | 782.88 | 944.13 | 1,083.35 |
| व्याजदर | 10.86% | 10.96% | 10.89% | 10.80% | 10.79% |
| एकूण व्याजखर्च | **43.61** | **61.68** | **77.99** | **93.30** | **109.42** |

- **चालू भांडवलावरील व्याज**

चालू भांडवलावरील व्याजदर बहू-वर्षीय वीज दर विनियम २०११ मध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या घटकांवर, आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी मोजण्यात आले आहेत.

**तक्ता २-४: चालू भांडवलावरील व्याज**

रू. कोटी

| अनु. क्र. | तपशील | एफवाय **2011-12 (Actuals)** | एफवाय **2012-13 (Actuals)** | एफवाय **2013-14 (Actuals)** | एफवाय **2014-15** | एफवाय **2015-16** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिकर्म आणि देखभाल खर्चाच्या रकमेची एकबारांश रक्कम | 11.34 | 10.82 | 10.52 | 15.84 | 18.28 |
| 2 | श्टोअर, साहित्य आणि पुरवठ्याच्या पुस्तकी मूल्याच्या बेरजेची एक बारांश रक्कम | 16.98 | 13.92 | 12.65 | 12.65 | 12.65 |
| 3 | पारेषण शुल्काच्या दीड महिन्यांएवढी | 45.88 | 30.85 | 97.56 | 68.70 | 79.20 |
| 4 | एकूण चालू भांडवल | **74.19** | **55.59** | 120.73 | **97.19** | **110.13** |
| | चालू भांडवलावरील व्याजाचे मोजमाप | | | | | |
| 5 | व्याजदर(%) | 14.39% | 14.61% | 14.58% | 14.75% | 14.75% |
| **6** | चालू भांडवलावर व्याज | **10.68** | **8.12** | **17.61** | **14.34** | **16.24** |

## **२.२.४ घसारा**

टाटा पॉवर-टीने घसाऱ्याचे मूल्यमापन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहूवर्षीय वीज दर) विनियम २०११ अंतर्गत लागू केलेल्या दरांनुसार आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी केला आहे. याच बाबीवर आधारित घसारा खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे मोजण्यात आला आहे.

**तक्ता २-५ : घसारा**

रू. कोटी

| तपशील | एफवाय 2011-12 (Actuals) | एफवाय 2012-13 (Actuals) | एफवाय 2013-14 (Actuals) | एफवाय 2014-15 | एफवाय 2015-16 |
|---|---|---|---|---|---|
| सुरूवातीचे जीएफए | 1,472.80 | 1,723.95 | 2,067.28 | 2,374.54 | 2,746.10 |
| एकूण घसारा | 47.28 | 67.71 | 84.85 | 98.83 | 117.41 |

| सरासरी घसारा (%) | **3.21%** | **3.93%** | **4.10%** | **4.16%** | **4.28%** |
|---|---|---|---|---|---|

### २.२.५ ओ ॲण्ड एम खर्च

आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१३-१४ या कालावधीसाठी ओ ॲण्ड एम खर्च बहूवर्षीय वीज-दर विनियम २०११ मध्ये दिलेल्या निकषांवर आधारित मोजमाप केले असून कार्यरत असलेल्या प्रत्यक्ष रांगा आणि वाहीन्यांची लांबी लक्षात घेतली आहे. आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीचे ओ ॲण्ड एम खर्च बहूवर्षीय वीज-दर विनियम २०११ मधील निकष लागू करून लावण्यात आले असून अंदाजे कार्यरत असणाऱ्या रांगा आणि वाहीन्यांची लांबी लक्षात घेण्यात आली आहे.

वरील गोष्टींवर आधारित, ओ ॲण्ड एम खर्च नियंत्रण कालावधीसाठी खालील तक्त्यात देण्यात आले आहेत.

**तक्ता: २-६ ओॲण्डएम खर्च**

रू. कोटी

| ओॲण्ड एम खर्च | एफवाय 2011-12 | एफवाय 2012-13 | एफवाय 2013-14 | एफवाय 2014-15 | एफवाय 2015-16 |
|---|---|---|---|---|---|
| निकष बे (लाख रूपये/बे) | | | | | |
| >400 KV | 0.00 | 99.11 | 104.78 | 110.78 | 117.11 |
| 66 आणि 400 KV यांच्यामध्ये | 28.49 | 30.12 | 31.85 | 33.67 | 35.60 |
| 66 KV पेक्षा कमी | 5.96 | 6.30 | 6.66 | 7.04 | 7.44 |
| निकष पारेषण मार्ग (लाख रूपये /सीकेटी किमी) | | | | | |
| >400 KV | 0.00 | 0.56 | 0.59 | 0.63 | 0.66 |
| 66 आणि 400 KV यांच्यामध्ये | 1.09 | 1.16 | 1.22 | 1.29 | 1.37 |
| ओॲण्ड एम खर्च | **136.04** | **151.08** | **170.17** | **190.13** | **219.42** |

### २.२.६ प्राप्तीकर

प्राप्तीकर आर्थिक वर्ष २०११-१२ ते २०१३-१४ साठी टाटा पॉवर-टीचा व्यवसाय टाटा पॉवरच्या इतर व्यवसायांपासून वेगळा म्हणून माननीय एटीईच्या आदेशांनुसार करण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०१४-१५ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी प्राप्तीकर ३० मार्च २०१३ रोजी बहूवर्षीय वीज दर आदेशामध्ये देण्यात आलेल्या तात्पुरत्या तरतुदींइतकाच मानला जाईल.

वरील बाबींवर आधारित आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीचा प्राप्तीकर खाली दाखवलेल्या तक्त्यात देण्यात आला आहे.

**तक्ता: २-७ प्राप्तीकर**

रू. कोटी

| तपशील | एफवाय 2011-12 (Actuals) | एफवाय 2012-13 (Actuals) | एफवाय 2013-14 (Actuals) | एफवाय 2014-15 | एफवाय 2015-16 |
|---|---|---|---|---|---|
| प्राप्तीकर | 40.99 | 53.43 | 55.86 | 32.20 | 32.20 |

**२.२.७ आपत्कालीन साठ्यात योगदान**

आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीसाठी आपत्कालीन साठ्यातील योगदान एकूण नियत मालमत्तेच्या ०.२५ टक्के मोजण्यात आला असून तो एकूण नियत मालमत्तेच्या ५ टक्क्यांपेक्षा अधिक वाढू नये. आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी आपत्कालीन साठ्यातील योगदान खालील तक्त्यात देण्यात आले आहे:

**तक्ता २-८: आपत्कालीन साठ्यात योगदान**

रू. कोटी

| तपशील | एफवाय 2011-12 (Actuals) | एफवाय 2012-13 (Actuals) | एफवाय 2013-14 (Actuals) | एफवाय 2014-15 | एफवाय 2015-16 |
|---|---|---|---|---|---|
| आपत्कालीन साठ्यात योगदान | 3.68 | 4.31 | 5.17 | 5.94 | 6.87 |

**२.२.८ दरेतर उत्पन्न**

आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी टाटा पॉवर टी ने प्रत्यक्ष दरेतर उत्पन्न पुरवले असून त्यात आवर्ती गोष्टी आणि अनावर्ती गोष्टींचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २०१४-१५ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी दरेतर उत्पन्न आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी प्रत्यक्ष दरेतर उत्पन्नाइतक्याच पातळीवर मोजण्यात आले आहे.

दरेतर उत्पन्न खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे:

**तक्ता २-९: दरेतर उत्पन्न**

रू. कोटी

| तपशील | एफवाय 2011-12 (Actuals) | एफवाय 2012-13 (Actuals) | एफवाय 2013-14 (Actuals) | एफवाय 2014-15 | एफवाय 2015-16 |
|---|---|---|---|---|---|
| दरेतर उत्पन्न | 14.18 | 12.48 | 18.24 | 18.24 | 18.24 |

**२.२.९ पारेषण उपलब्धतेवर सवलत**

आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी टाटा पॉवरच्या पारेषण यंत्रणेची उपलब्धता महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने प्रमाणित केल्यानुसार सादर करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०१४-१५ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या कालावधीसाठी कोणत्याही प्रकारच्या सवलतीचा विचार करण्यात आला नाही. तथापि त्याचे मोजमाप संबंधित वर्षांच्या सत्य पडताळणीच्या सादरीकरणादरम्यान केले जाईल. नियंत्रण कालावधीसाठीच्या सवलती खालील तक्त्यात देण्यात आल्या आहेत:

**तक्ता २-१० : नियंत्रण कालावधीसाठी फायदे**

रू. कोटी

| तपशील | एफवाय 2011-12 (Actuals) | एफवाय 2012-13 (Actuals) | एफवाय 2013-14 (Actuals) | एफवाय 2014-15 | एफवाय 2015-16 |
|---|---|---|---|---|---|
| फायदा | 4.69 | 6.00 | 7.16 | - | - |

### २.२.१० वार्षिक महसुलाची आवश्यकता

आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१३-१४ साठीच्या प्रत्यक्षावर आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीच्या विविध घटकांच्या अंदाजांवर आधारित विविध वर्षांसाठीचा आवश्यक एकूण वार्षिक महसूल खालील तक्त्यात दिल्यानुसार मोजण्यात आला आहे.

**तक्ता २-११ : आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१३-१४ साठीचा आवश्यक वार्षिक महसूल आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी वार्षिक पारेषण दर**

*Rs. Crores*

| तपशील | एफवाय 2011-12 (Actuals) | एफवाय 2012-13 (Actuals) | एफवाय 2013-14 (Actuals) | एफवाय 2014-15 | एफवाय 2015-16 |
|---|---|---|---|---|---|
| ओॲण्डएम दर | 118.29 | 129.85 | 126.30 | 190.13 | 219.42 |
| दीर्घकालीन कर्जावर व्याज | 43.61 | 61.68 | 77.99 | 93.30 | 109.42 |
| चालू भांडवलावर व्याज | 9.20 | 8.12 | 17.61 | 14.34 | 16.24 |
| इतर वित्तीय शुल्क | 0.01 | 0.08 | 0.03 | 0.00 | 0.00 |
| घसारा | 47.28 | 67.71 | 84.85 | 98.83 | 117.41 |
| समभागावर परतावा | 88.36 | 102.18 | 117.31 | 133.09 | 150.26 |
| प्राप्तीकर | 40.99 | 53.43 | 55.86 | 32.20 | 32.20 |
| वैधानिक दर | 3.68 | 4.31 | 5.17 | 5.94 | 6.87 |
| वार्षिक पारेषण शुल्क | **351.43** | **427.37** | **485.11** | **567.83** | **651.82** |
| बेरीज:फायदा | 4.69 | 6.00 | 7.16 | 0.00 | 0.00 |
| एकूण पारेषण शुल्क | **356.12** | **433.37** | **492.27** | **567.83** | **651.82** |
| वजा: दरेतर उत्पन्न | 14.18 | 12.48 | 18.24 | 18.24 | 18.24 |
| पारेषण दरापासून आलेली निव्वळ एकूण महसूल गरज | **341.94** | **420.89** | **474.04** | **549.59** | **633.58** |

### २.२.११ आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी निव्वळ वार्षिक पारेषण दर आणि (तफावत)/ शिल्लक

वरील चर्चेवर आधारित आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी निव्वळ हक्क आणि तफावत खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

तक्ता २-१२ निव्वळ वार्षिक पारेषण दर आणि आर्थिक वर्ष २०११-१२ साठी तफावत

२-१३: निव्वळ वार्षिक पारेषण दर आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी तफावत

२-१४: निव्वळ वार्षिक पारेषण दर आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी तफावत

**२.३ माननीय एटीई आदेशांचे परिणाम**

या सादरीकरणात खालील एटीई आदेशांचे परिणाम विचारात घेण्यात आले आहेत-

- अपील क्रमांक १०४/२०१२ दिनांक २८ नोव्हेंबर २०१३
- अपील क्रमांक १५८/२०१२ दिनांक २८ नोव्हेंबर २०१३
- अपील क्रमांक १३३/२०१३ दिनांक ९ एप्रिल २०१४

एटीई आदेशांचे परिणाम खालीलप्रमाणे आहेत-

तक्ता २-१५ एटीई आदेशांचे परिणाम

**२.४ निव्वळ तफावत/ (शिल्लक) ज्यात माननीय एटीईच्या आदेशांचे परिणाम आणि बहूवर्षीय वीज दर आदेशांनुसार मागील वसुलीची मान्यता.**

आपल्या बहूवर्षीय वीज दर आदेशामध्ये माननीय आयोगाने (पान क्रमांक ९२/१०३) मध्ये आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये मागील वसुली खालीलप्रमाणे करण्याची परवानगी दिली आहे.

आयोगाने मान्यता दिलेला महसूल (तफावत)/शिलकीचा सारांश आणि टीटीएससी आदेशानुसार विचाराधीन असलेली एकूण पारेषण शुल्क वसुली त्यानंतरच्या वर्षासाठी खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

तक्ता: ४.४० आयोगाने मान्य केल्यानुसार मागील काळातील वसुलीचा समावेश असलेला एकुण वार्षिक महसुल

नोंद: (पारेषण शुल्कच्या वसुली संबंधित विभागात चर्चा केल्यानुसार आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीचा एकूण वार्षिक महसुल आणि मागील काळातील वसुली आर्थिक वर्ष २०१३-१४ च्या एकूण वार्षिक महसुलासोबत त्यानंतरच्या वर्षासाठी टीटीएससी आदेशानुसार वसुलीसाठी लागू करण्यात येईल)

माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या वरील तफावतीशिवाय, बहूवर्षीय वीज दर नियामक २०११ नुसार आर्थिक वर्ष २०११-१२ साठी सुधारित तफावत लक्षात घेऊन आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी मोजण्यात आलेल्या सुधारित तफावत/शिल्लक लक्षात घेऊन आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये वसूल करण्यात येणारी एकूण रक्कम **१९४.५७ कोटी रुपये** असेल असे मोजण्यात आले असून ते खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहे.

तक्ता २.१६ आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये वसूल करण्यात येणारी एकूण तफावत/ (शिल्लक)

त्यामुळे वसूल करण्यात येणारी एकूण रक्कम **१९४.५७ कोटी रूपये** असेल जी आर्थिक वर्ष १५-१६ साठीच्या एकूण वार्षिक महसुलामध्ये वसूल करण्यात येईल. त्यामुळे आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी एकूण वार्षिक महसुल खालीलप्रमाणे देण्यात आली आहे.

तक्ता- २-१७ : आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी एकूण वार्षिक महसुलाची गरज

माननीय आयोगाला वरील एकूण वार्षिक महसुल आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी मान्य करावेत अशी विनंती करण्यात येत आहे.